आधुनिक शहरातील घडामोडी
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
e Paper
वर्ष 4थे
www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 05/10/2026 METRO CITY VRUTANT
संपादक : रफी हुसेन | पिंपरी चिंचवड व पुणे | पान 4 | अंक 210 | RNI - MAHMAR /2021/51259 | metrocity924@gmail.com

# शिव-शंभू विचारांचा गगनभेदी निनाद पिंपरी-चिंचवडचा गिनीज विश्वविक्रम!

## - मोशी, स्पाईन रोड आणि वाघेश्वर मंदिर, चऱ्होली तीन ठिकाणी एकाचवेळी वादन
## - हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष, आमदार महेश लांडगे यांचा 'रेकॉर्ड ब्रेक' सोहळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पाच हजाराहून अधिक ढोलांचा एकसंध ठेका, सलग पाच मिनिटांचे शिस्तबद्ध सामूहिक वादन आणि शिव-शंभूंच्या जयघोषाने पिंपरी-चिंचवडमध्ये रविवारी ऐतिहासिक क्षण साकारला. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना सोहळा रविवार, दि. 4 ऑक्टोबर 2026 रोजी उत्साहात पार पडला. हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या या सोहळ्यात एकाच वेळी सर्वाधिक ढोल वाजविण्याचा विश्वविक्रम नोंदविण्यात आला. या कामगिरीची 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद झाल्याची माहिती आयोजकांनी दिली.**



हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट, पिंपरी-चिंचवड आणि ढोल-ताशा महासंघ, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सोहळ्यात महाराष्ट्रभरातील पथकांनी सहभाग घेतला. मोशी, स्पाईन रोड आणि वाघेश्वर मंदिर, चऱ्होली अशा तीन ठिकाणी ढोल-ताशांचे वादन करण्यात आले. यापूर्वी 2 हजार 650 ढोल-ताशा वादनाचा विश्वविक्रम होता. पिंपरी-चिंचवडमध्ये आता 4 हजार 112 ढोल-ताशा वादनाचा विश्वविक्रम प्रस्थापित करण्यात आले. सोहळ्याची सुरुवात स्वागत आणि प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर शिवशंभो गर्जना सादर झाली, गो सन्मान आवाहन अभियान राबवण्यात आले आणि मर्दानी खेळांनी उपस्थितांची मने जिंकली. गिनीज रेकॉर्डच्या तयारीसाठी ढोल-ताशा पथकांची मांडणी करण्यात आली, त्यानंतर पुन्हा शिवशंभो गर्जना झाली. शंखनादानंतर छत्रपती संभाजी महाराजांना ढोल-ताशांच्या गजरात मानवंदना देण्यात आली.

यानंतर मर्दानी खेळ, शाहीर चंद्रकांत माने यांचे शाहिरी सादरीकरण, विशेष कविता सादरीकरण आणि शिवशंभूगर्जना सादर झाली. शाहीर खुपिरे यांनी आपल्या खास शैलीत सादरीकरण केले, तसेच ढोल-ताशा महासंघाच्या वतीने मनोगत व्यक्त करण्यात आले. उपस्थितांनी नशामुक्त भारताची सामुदायिक प्रतिज्ञा घेतली. आमदार महेश लांडगे यांनी संबोधन करून संपूर्ण "वंदे मातरम्" गायनाचे आवाहन केले. त्यानंतर गिनीज रेकॉर्डबाबत माहिती देण्यात आली आणि सामूहिक ढोल-ताशा सेलिब्रेशन झाले. शाहीर खुपिरे यांनी धनगर ओव्या सादर केल्या. समारोपात उपस्थितांचे आभार मानण्यात आले आणि पुढील वर्षी रविवार, 19 सप्टेंबर 2027 रोजी याच ठिकाणी हा कार्यक्रम नव्या उत्साहात आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आला.

### तीन संधी; पाच मिनिटांच्या शिस्तबद्ध वादनातून विक्रम

विश्वविक्रमाच्या प्रयत्नासाठी वादकांना तीन संधी उपलब्ध होत्या. एकाच वेळी सर्वाधिक ढोलांचे सलग पाच मिनिटे शिस्तबद्ध वादन करणे हे या प्रयत्नाचे प्रमुख उद्दिष्ट होते. सामूहिक वादनातील एकसंधपणा, ठेक्यातील सातत्य आणि समन्वय राखत पथकांनी विश्वविक्रमाचा संकल्प पूर्णत्वास नेला. विविध पथकांतील हजारो वादकांनी एकत्र येत महाराष्ट्राच्या रणवाद्य परंपरेची ताकद दाखवून दिली. ढोल-ताशांच्या गगनभेदी निनादातून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याला मानवंदना अर्पण करण्यात आली. भारतमाता ची मनमोहक रंगावली रेखाटण्यात आली होती.

### शिव-शंभूंचा जयघोष; राष्ट्रभक्तीचा जागर

'हर हर महादेव', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय', 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय', 'भारत माता की जय' आणि 'वंदे मातरम्' अशा गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा ठेका आणि उपस्थितांचा जयघोष यांतून शिव-शंभूंच्या पराक्रमाला वंदन करण्यात आले. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्यात शौर्य, सांस्कृतिक परंपरा, राष्ट्रभक्ती आणि सामाजिक बांधिलकीचा संगम अनुभवायला मिळाला. गतवर्षीच्या मानवंदनेची प्रेरणा घेऊन यंदा अधिक व्यापक सहभागातून विश्वविक्रम साकारल्याचे आयोजकांनी नमूद केले.

### 111 शंखांचा निनाद, निर्माणाधीन धर्मध्वजालाही मानवंदना

'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'सोबत उभारण्यात येत असलेल्या 128 मीटर उंच भगव्या धर्मध्वजाच्या गौरवार्थही मानवंदना देण्यात आली. शिव-शंभूंच्या गौरवशाली स्मृतींना अभिवादन आणि महाराष्ट्राच्या पारंपरिक वाद्यांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या सोहळ्यातून देण्यात आला. सोहळ्यात 111 शंखांचा सामूहिक शंखनाद विशेष आकर्षण ठरला. 'शिवशंभो गर्जना' या शिवभक्तीपर सांगीतिक कार्यक्रमातून शिव-शंभूंच्या विचारांचा आणि पराक्रमाचा जागर करण्यात आला.

### गोमाता सन्मान अभियानाची जागृती; नशामुक्तीची प्रतिज्ञा

सोहळ्याच्या निमित्ताने 'गोमाता सन्मान अभियान'विषयी जनजागृती करण्यात आली. सांस्कृतिक सादरीकरणांसोबत सामाजिक बांधिलकीचा संदेश देत 'नशामुक्त भारत अभियान'अंतर्गत सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. स्वतः व्यसनमुक्त राहण्याबरोबरच कुटुंब आणि समाजात जागृती करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. संपूर्ण 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनातून मातृभूमीला स्वरांची मानवंदना अर्पण करण्यात आली. हजारो वादकांची शिस्त, पथकांचा समन्वय आणि शिव-शंभूप्रेमींच्या सहभागातून साकारलेला हा विश्वविक्रम पिंपरी-चिंचवडच्या सांस्कृतिक इतिहासातील अभिमानाचा क्षण ठरला.



धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला हजारो ढोल-ताशांच्या निनादातून अर्पण केलेली ही मानवंदना म्हणजे महाराष्ट्राच्या शौर्य, संस्कृती आणि एकजुटीचा अभिमानास्पद आविष्कार आहे. वादकांची शिस्त, पथकांचा समन्वय आणि शिव-शंभूप्रेमींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे विश्वविक्रमाचा संकल्प साकार झाला. या यशाचे खरे मानकरी सर्व वादक, पथकप्रमुख, स्वयंसेवक, सहकारी आणि संस्कृती प्रेमी नागरिक आहेत.

शिव-शंभूंच्या विचारांची प्रेरणा घेऊन सांस्कृतिक वारसा जपण्यासोबतच व्यसनमुक्त आणि सामाजिकदृष्ट्या जागरुक समाज घडविण्यासाठी आपण एकत्र काम करूया!

**महेश लांडगे**
आमदार तथा अध्यक्ष, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 05/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# मराठी लोकसंस्कृतीचा सुरेल 'अंतर्नाद अ जर्नी टू द सोल' ने रसिकांना केले अंतर्मुख!

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिन' व 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'तील कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**संतवाणीतील भक्तिभावापासून ते पोवाड्याच्या जोशापर्यंत... लावणीच्या ठेक्यापासून ते भारुडाच्या सामाजिक आशयापर्यंत... आणि ओव्यांच्या भावविश्वापासून पंढरीच्या विठ्ठलापर्यंतचा सुरेल प्रवास 'अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल' या नाट्य-संगीतमय आविष्कारातून रसिक प्रेक्षकांना अंतर्मुख करुन गेला.**



अभिजात मराठी भाषेचा जागर घडविण्यासह मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली 3 ऑक्टोबर हा 'अभिजात मराठी भाषा सन्मान दिन' तसेच 3 ते 9 ऑक्टोबर 2026 या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे मोरया थिएटर्सच्या वतीने 'अंतर्नाद – अ जर्नी टू द सोल' हा नाट्य-संगीतमय आविष्कार सादर करण्यात आला. मराठी संतपरंपरा, लोकसंगीत, भक्तिरस आणि महाराष्ट्राच्या लोकजीवनातील विविध रंगांची सुरेल गुंफण या कार्यक्रमातून रसिकांना अनुभवायला मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात 'विठ्ठल माझा मला पावलं का...' या गीताने झाली. त्यानंतर 'पालखी सोहळा', गवळण, 'पोवाडा', 'दिंडीचे वर्णन सांगणारे गीत', 'गोंधळ' अशा विविध सादरीकरणांनी कार्यक्रमाला रंगत आणली. पुढे रॅप, लावणी, पिंगळा, रिंगण, भारुड अशा विविध कलाप्रकारांच्या सादरीकरणातून मराठीच्या विविध बोली, लोकपरंपरा आणि समृद्ध संगीतविश्वाचे दर्शन घडले.

संतपरंपरेतील भक्तिरस, लोककलेतील उत्स्फूर्तता आणि मराठी मातीतील सांस्कृतिक वैविध्य यांचा सुरेल संगम या आविष्कारातून साधण्यात आला. शब्दांना सूर, सुरांना भाव आणि भावनांना लोकसंस्कृतीची समृद्ध किनार लाभल्याने 'अंतर्नाद' हा अभिजात मराठी भाषेच्या सांस्कृतिक वैभवाचा अनुभव देणारा ठरला.



या निमित्ताने मराठी संस्कृतीतील विविध लोककला आणि संगीतप्रकारांची बहारदार अनुभूती प्रेक्षकांना मिळाली. उपस्थित रसिकांनी या नाट्य-संगीतमय कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत अभिजात मराठी भाषेच्या जागरात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

### पारंपरिक वाद्यांच्या निनादात मराठी संस्कृतीचा जागर; तरुणाईने धरला ताल !

सनई, हलगी, संबळ आदी पारंपरिक वाद्यांच्या निनादात 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'चा उत्साहपूर्ण शुभारंभ करण्यात आला. पारंपरिक वाद्यांच्या सुरांनी सकाळपासूनच परिसरात मराठी संस्कृतीचा जागर अनुभवायला मिळाला. ताशाकिंग सिराजभाई यांच्या ताशा वादनाने वातावरणात उत्साह निर्माण झाला.

त्यानंतर पारंपरिक गीतांवर संबळ वादन करण्यात आले. तसेच हलगी वादनातून महाराष्ट्राच्या लोकपरंपरेतील जोश आणि उत्स्फूर्ततेचे दर्शन घडले. पारंपरिक वाद्यांच्या ताल-सुरांनी अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या शुभारंभाला लोककलेचा अनोखा रंग लाभला.

यावेळी बँड पथकाने 'जय जय महाराष्ट्र माझा' या महाराष्ट्राच्या अस्मितेचा जागर करणाऱ्या गीताचे उत्साहपूर्ण सादरीकरण केले. ताशा, संबळ, हलगी आणि बँडच्या तालावर परिसरातील वातावरण भारावून गेले. मराठी भाषेचा अभिमान आणि महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा उत्सव साजरा करणाऱ्या या उपक्रमात तरुणाईने उत्स्फूर्तपणे सहभाग घेत ताल धरत जल्लोष केला. पारंपरिक लोकवाद्यांच्या निनादाने आणि 'जय जय महाराष्ट्र माझा'च्या सुरांनी उपस्थितांमध्ये उत्साह संचारला.

कलाकारांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या शुभारंभाचा आनंद द्विगुणित केला.

### अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमांना 'हाऊसफुल्ल' प्रतिसाद!

अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या पहिल्याच दिवशी आयोजित कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहातील सर्व आसने भरुन गेल्याने कार्यक्रमाला 'हाऊसफुल्ल' प्रतिसाद लाभला.

मराठी भाषा, साहित्य, लोककला आणि संस्कृतीशी जोडलेल्या सप्ताहातील विविध कार्यक्रमांचा रसिकांनी आनंद घेतला. टाळ्यांच्या कडकडाटाने कलाकारांचा उत्साह वाढवला.

# ‘मंगलगाणी - दंगलगाणी’ ने मराठी संस्कृतीला स्पर्श करीत रसिकांची जिंकली मने!

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अभिजात मराठी भाषा सप्ताहात मराठी संस्कृतीचा सुरेल जागर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : संतवाणीतील भक्तिरसाची अनुभूती... शाहिरी आणि पोवाड्यांतून जागणारा पराक्रमाचा हुंकार... लावणीच्या ठेक्यावर थिरकणारी पावले... लोकपरंपरेतील गोंधळ, भारूड, ओव्या आणि गवळणींतून उलगडणारे मराठमोळे जीवन... अशा महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा सुरेल, तालबद्ध आणि बहुरंगी आविष्कार ‘मंगलगाणी - दंगलगाणी’ या कार्यक्रमातून**

**अनुभवायला मिळाला. भक्तीपासून शौर्यापर्यंत, लोककलेपासून नाट्यसंगीतापर्यंत आणि जुन्या अजरामर गीतांपासून ठसकेबाज लावणीपर्यंतच्या या संगीतमय प्रवासाने पिंपरी चिंचवडकर रसिकांना मंत्रमुग्ध करीत मराठी बाण्याची जाणीव पुन्हा एकदा जागवली.**

अभिजात मराठी भाषेचा जागर घडविण्यासह मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली 3 ते 9 ऑक्टोबर 2026 या कालावधीत ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहांतर्गत चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात मराठी वाद्यवृंदाच्या इतिहासात वेगळा प्रयोग म्हणून रसिकमान्यता आणि लोकप्रियता मिळविलेल्या



'मंगलगाणी दंगलगाणी’ या ‘चौरंग’निर्मित तसेच सुप्रसिद्ध कलाकार अशोक हांडे दिग्दर्शित कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ‘पसायदान’पासून ते पु. ल. देशपांडे यांच्या ‘कसाईदाना’पर्यंतचा मराठी गाणी, संगीत आणि संस्कृतीचा संगीतमय इतिहास या कार्यक्रमातून उलगडण्यात आला. मराठी नृत्य व लोकसंगीताला स्पर्श करणारा, आगळावेगळा, रसिकांसाठी रंजक ठरणारा, पोटभरून हसविणारा हा बहारदार कार्यक्रम रसिकांच्या पसंतीस उतरला.

अभंग, शाहिरी, काव्य, पोवाडे, लावणी, गवळण, नाट्यसंगीत, भावसंगीत, सुगमसंगीत आणि चित्रपटगीते अशा महाराष्ट्राच्या समृद्ध सांगीतिक ठेव्याचा अनुभव रसिकांना मिळाला.

### नृत्य, नाट्य, चित्रफीत, गाणी आणि संगीत यांचा सुरेख मिलाफ

‘मोगरा फुलला’ या सुरेल गीताने

कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर ‘पसायदान’, ‘खेळ मांडियेला’, ‘रात्र काळी’, ‘कानडा राजा पंढरीचा’ या गीतांतून भक्तिरस आणि अध्यात्माचा स्वर अधिक गहिरा झाला. ‘सूर्य उगवला प्रकाश पडला, 'आडवा डोंगर’ या भारुडातून लोककलेचा बाज अनुभवायला मिळाला, तर ‘विठ्ठल माझा भाऊ गं’ या जात्यावरील ओवीने ग्रामीण जीवनातील परंपरा आणि भावविश्व उलगडले. ‘घनश्याम सुंदरा, अरुणोदय झाला’ या गीताने पहाटेच्या प्रसन्न वातावरणाची अनुभूती दिली. ‘रानात सुरु झालीय पेरण’ या शेतकरी गीतातून काळ्या मातीशी असलेले नाते आणि श्रमसंस्कृतीचे दर्शन घडले.

‘काठी अन् घोंगडं घेऊ द्या की र, मला बी जत्रेला येऊ द्या की’ या लोकगीताने ग्रामीण जीवनातील उत्साह आणि जत्रेचा आनंद जागवला. ‘शूर आम्ही सरदार आम्हाला काय कुणाची भीती’ या गीताने शौर्याची भावना चेतवली. ‘दार उघड’ या गोंधळातून महाराष्ट्राच्या लोकधार्मिक परंपरेचा आविष्कार झाला. कोकणातील दशावतार परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या ‘पहिलं नमन’ या सादरीकरणासह त्यानंतर झालेल्या ढोलकी वादनाने कार्यक्रमात तालाचा नवा रंग भरला. त्यानंतर सादर झालेल्या लावणी, सण-उत्सवाची गाण्यांनी महाराष्ट्राच्या लोकजीवनातील उत्साह खुलविला. कोळीगीतांच्या सादरीकरणातून सागरी किनारपट्टीवरील जीवनशैलीचा स्पर्श झाला, तर ‘सागरा प्राण तळमळला’ या गीतातून स्वातंत्र्याची तळमळ आणि देशप्रेमाची भावना व्यक्त झाली. नाट्यसंगीताच्या भावविश्वात घेऊन जाणाऱ्या ‘रात्रीचा समय सरुनी’ या गीतानंतर ‘शुक्रतारा मंद वारा’ आणि ‘स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला’ या गीतांनी प्रेमभावना आणि सुरेल संगीताचा अनुभव दिला. ‘लटपट लटपट तुझं चालणं’, ‘बाई मी विकत घेतला शाम’, ‘नाच रे मोरा नाच’, ‘ऐरणीच्या देवा’ आणि ‘बैल तुझे हरणावणी’ यांसारख्या गीतांनी विविध संगीतप्रकारांची रंगत वाढवली. विविध बोली, प्रादेशिक संगीतपरंपरा, लोककला आणि लोकप्रिय मराठी गीतांचा हा सुरेल प्रवास रसिकांना महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाची अनुभूती देणारा ठरला. या कार्यक्रमाने मनोरंजनासोबतच मराठी भाषेची गोडी, लोककलेचे महत्त्व आणि सांस्कृतिक परंपरांचे मोल अधोरेखित केले.

# शब्द, सूर अन् आठवणींचा सुरेल मंगेशकरी आविष्कार!

## गीतांच्या निर्मिती मागील आठवणी, रंजक किस्से आणि सुरेल सादरीकरणाने प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह भारावले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शब्दांमधील भाव जाणून घेत त्यांना स्वरांची साथ देत जन्माला आलेली गाणी आणि त्या गीतांच्या निर्मितीमागच्या असंख्य आठवणी... कधी गानसम्राज्ञी लता मंगेशकरांच्या स्वरांची आठवण, तर कधी आशा भोसले यांच्या गायकीचा संदर्भ, कधी शांता शेळके आणि सुरेश भट यांच्या शब्दांमागच्या कथा... अशा शब्द-सूर-आठवणींच्या त्रिवेणीने पं. हृदयनाथ मंगेशकर प्रस्तुत ‘गाणी मंगेशकरांची’ ही मैफल रसिकांच्या मनाचा ठाव घेणारी ठरली.**

अभिजात मराठी भाषेचा जागर घडविण्यासह मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांच्या अधिपत्याखाली 3 ते 9 ऑक्टोबर 2026 या कालावधीत ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहांतर्गत प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, चिंचवड येथे हा सांगीतिक कार्यक्रम झाला.



पं. हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीतबद्ध केलेल्या लोकप्रिय गीतांनी संपूर्ण प्रेक्षागृह सुरांनी भारून गेले. ‘माझ्या सारंगा’, ‘गोमू माझ्या तू संगतीने’, ‘सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या’, ‘चांदण्यात फिरताना’, ‘धरला तू माझा हात’, ‘मी डोलकर डोलकर’, ‘डोलकर दर्याचा राजा’, ‘घर पाण्यावरी’, ‘बंदराला करतो ये-जा’, ‘माझे रानी, माझे मोगा’, ‘तुजे डोळ्यांत शोधता ठाव’ आणि ‘मोगरा फुलला’ अशा एकाहून एक लोकप्रिय गीतांनी रसिकांना सुरांच्या भावविश्वात चिंब भिजवले.

या गीतांचे सादरीकरण हे या मैफलीचे वैशिष्ट्य ठरलेच; मात्र त्यामागील कथा आणि आठवणींनी कार्यक्रमाला वेगळीच उंची दिली. एखाद्या गीताची रचना कशी सुचली, शब्दांमधील भाव ओळखून त्याला चाल कशी लाभली, संगीतबद्ध करताना कोणते प्रसंग घडले, अशा अनेक आठवणी पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी रसिकांशी संवाद साधत उलगडल्या. त्यामुळे ऐकलेली गाणी पुन्हा ऐकताना त्यामागील भावविश्व जाणून घेण्याची नवी दृष्टी रसिकांना मिळाली.

### लता मंगेशकर, आशा भोसले यांच्या आठवणींसह शांता शेळके, सुरेश भट यांच्या गीतनिर्मितीचा रंजक प्रवास:

ज्येष्ठ गायिका भारतरत्न दिवंगत लता मंगेशकर आणि ज्येष्ठ गायिका पद्मविभूषण आशा भोसले यांच्यासोबतच्या सांगीतिक प्रवासातील आठवणी सांगताना पं. हृदयनाथ मंगेशकर भावुक झाले. दोन्ही बहिणींसोबत काम करतानाचे अनुभव, त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यांपासून ते गाण्याच्या सादरीकरणापर्यंतचे अनेक किस्से त्यांनी रसिकांसमोर मांडले. कवयित्री शांता शेळके आणि गझलकार सुरेश भट यांच्या शब्दांमागील भावविश्व उलगडताना गीतनिर्मितीच्या प्रक्रियेतील अनेक रंजक प्रसंगही त्यांनी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

सोमवार दिनांक 05/10/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पुणे फेस्टिवल वतीने पत्रकार शबनम सय्यद यांचा सन्मान

## 'पुणे फेस्टिवल चे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्याकडून कौतुक




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : पुण्यात नुकताच 38 वा पुणे फेस्टिवल मोठ्या उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, कला आणि मनोरंजनाची मेजवानी ठरलेल्या या फेस्टिवलमधील विविध उपक्रमांचे प्रभावी वृत्तांकन करण्याची संधी शबनम न्यूज मीडिया ग्रुपला मिळाली.**

पुणे फेस्टिवलदरम्यान झालेल्या विविध कार्यक्रमांच्या बातम्या एकत्रित करुन शबनम न्यूज मीडिया ग्रुपच्या वतीने 'पुणे फेस्टिवल वृत्तांत विशेष' हे आकर्षक बुकलेट तयार करण्यात आले. या बुकलेटमध्ये फेस्टिवलमधील प्रत्येक महत्त्वपूर्ण कार्यक्रमाची बातमी आणि त्याचा वृत्तांत प्रसिद्ध करण्यात आला आहे.

हे विशेष बुकलेट पुणे फेस्टिवलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांना भेट देण्यात आले. त्यांनी बुकलेटचे आनंदाने स्वागत करत त्याच्या आकर्षक मांडणीचे तसेच संपूर्ण फेस्टिवलचे सातत्याने केलेल्या वृत्तांकनाचे कौतुक केले. यावेळी त्यांनी शबनम न्यूज मीडिया ग्रुपच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. दरम्यान, पुणे फेस्टिवलच्या यशस्वी आयोजनानिमित्त कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. फेस्टिवलच्या यशामागे योगदान देणाऱ्या पदाधिकारी, विश्वस्त, समिती प्रमुख आणि कार्यकर्त्यांचे यावेळी आभार मानण्यात आले.

याच कृतज्ञता सोहळ्यात शबनम न्यूज मीडिया ग्रुपच्या संचालिका शबनम सय्यद यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पुणे फेस्टिवलच्या चेअरपर्सन मीरा कलमाडी यांच्या हस्ते शबनम सय्यद यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुणे फेस्टिवलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, सेक्रेटरी डॉ. सतीश देसाई, उपाध्यक्ष सुभाष सनस, मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, माजी मंत्री रमेश बागवे यांच्यासह पुणे फेस्टिवलचे विश्वस्त, समिती प्रमुख आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

'पुणे फेस्टिवल वृत्तांत विशेष' या बुकलेटमध्ये प्रत्येक कार्यक्रमाचे स्वतंत्रपणे प्रभावी वृत्तांकन करण्यात आले असून, आकर्षक स्वरुपात तयार करण्यात आलेल्या या उपक्रमाचे पुणे फेस्टिवलच्या पदाधिकारी आणि विश्वस्तांकडून विशेष कौतुक करण्यात आले. शबनम न्यूज मीडिया ग्रुपने केलेले हे वृत्तांकन पुणे फेस्टिवलच्या सांस्कृतिक वाटचालीचा दस्तऐवज ठरणारे असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# संभाजी बारणेंना 'छंद सम्राट पुरस्कार 2026' जाहीर!

## शिवचरित्र, ऐतिहासिक वस्तू आणि लोकप्रतिनिधींच्या व्हिजिटिंग कार्डच्या अनोख्या संग्रहाची दखल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : छंद जोपासत त्याला सामाजिक आणि ऐतिहासिक जतनाची जोड देणारे पिंपरी-चिंचवडमधील सामाजिक कार्यकर्ते व शिवप्रेमी संभाजी बाळासाहेब बारणे यांच्या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेत त्यांची 'छंद सम्राट पुरस्कार 2026' साठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र सन्मान परिषदेतर्फे आयोजित या पुरस्कारामुळे बारणे यांच्या अनोख्या संग्रहकार्याला मोठा सन्मान मिळाला आहे.**

छंद सम्राट सामाजिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा हा पुरस्कार समाजात प्रेरणा निर्माण करणाऱ्या आणि आपल्या अनोख्या छंदातून सामाजिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा जतन करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी प्रदान केला जातो. संभाजी बारणे



यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक हजारांहून अधिक शिवचरित्रे व पुस्तके, विविध प्रकारचे शिवरायांचे पुतळे, जुनी नाणी, देवी-देवतांच्या मूर्ती तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील लोकप्रतिनिधींच्या व्हिजिटिंग कार्डचा अनोखा संग्रह केला आहे.

विशेष म्हणजे, संभाजी बारणे यांच्या या संग्रहकार्याची यापूर्वीही दोन वेळा इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. सन 2019 मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत शहरातील लोकप्रतिनिधींच्या व्हिजिटिंग कार्डचे संकलन केल्याबद्दल त्यांच्या नावाची इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित एक हजारांहून अधिक शिवचरित्रांचे संकलन करण्याच्या त्यांच्या विक्रमाचीही इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतली.

त्यामुळे सलग दोन वेळा इंडिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद होणाऱ्या व्यक्ती म्हणून संभाजी बारणे यांच्या संग्रहकार्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या अनोख्या छंदामागे इतिहास, संस्कृती आणि शिवचरित्र पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची भूमिका असल्याचे मानले जाते.

त्यांच्या संग्रहातून ऐतिहासिक वारशाबद्दलची आस्था आणि जतनाची तळमळ दिसून येते.

'छंद सम्राट पुरस्कार 2026'चा सन्मान सोहळा 15 नोव्हेंबर 2026 रोजी सकाळी 11 ते दुपारी 1 या वेळेत चिंचवड परिसरात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात संभाजी बारणे यांचा गौरव करण्यात येणार आहे. संभाजी बारणे यांच्या निवडीचे विविध क्षेत्रांतून स्वागत होत असून, या पुरस्कारामुळे त्यांच्या सामाजिक, ऐतिहासिक आणि समाजोपयोगी कार्याला आणखी बळ मिळेल, अशी भावना व्यक्त होत आहे.